## BOMBAY ACT No. VI OF 1959.

### THE BOMBAY PUBLIC TRUST (UNIFICATION AND AMENDMENT) ACT, 1959.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति दिनांक २२ जानेवारी १९६० रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे:—

एन्. क. द्रविड,

मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.

## BOMBAY ACT No. VI OF 1960.

### AN ACT TO EXTEND THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT, 1950 TO THE REST OF THE STATE OF BOMBAY, TO PROVIDE FOR THE REPEAL OR CESSATION OF CERTAIN CORRESPONDING LAWS IN FORCE IN PARTS OF THE STATE RELATING TO PUBLIC TRUSTS TO WHICH THAT ACT IS APPLIED; AND FOR THOSE AND CERTAIN OTHER PURPOSES FURTHER TO AMEND THAT ACT.

## सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६.

[राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर, "मुंबई राजपत्रांत" दिनांक २८ जानेवारी १९६० रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

**मुंबईचा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०, हा मुंबई राज्याच्या उरलेल्या भागास लागू करण्याबाबत, तो अधिनियम राज्याच्या ज्या भागास लागू करण्यांत येत आहे त्या भागांत अंमलांत असलेले, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधींचे विवक्षित तत्सम अधिनियम रद्द करण्याची किंवा त्यांचा अंमल बंद करण्याची तरतूद करण्याबाबत आणि त्या व इतर विवक्षित कारणासाठीं त्या अधिनियमांत आणखी सुधारणा करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबईचा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०, हा मुंबई राज्याच्या उरलेल्या भागास लागू करणें, तो अधिनियम राज्याच्या ज्या भागास लागू करण्यांत येत आहे त्या भागांत अंमलांत असलेले, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधींचे विवक्षित तत्सम अधिनियम रद्द करण्याची किंवा त्यांचा अंमल बंद करण्याची तरतूद करणें आणि त्या व इतर विवक्षित कारणांसाठीं त्या अधिनियमांत आणखी सुधारणा करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी, याद्वारें, पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबईचा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (एकत्रीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९, असें म्हणावें. लघु संज्ञा व प्रारंभ.

(२) तो, राज्य सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून जी तारीख नेमून देईल त्या तारखेस अंमलांत येईल.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ उरलेल्या मुंबई राज्यास लागू करणें.

२. मुंबईचा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (ज्याचा यांत यापुढें उक्त अधिनियम असा उल्लेख केला आहे) हा, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, मुंबई राज्याच्या ज्या प्रदेशांस लागू नव्हता त्या प्रदेशांस तो, याद्वारें, लागू करण्यांत येत आहे.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम १ ची सुधारणा.

३. उक्त अधिनियमाचें कलम १ यांत,—

(अ) पोट-कलम (२) एवजीं पुढील पोट-कलम दाखल करावें :—

"(२) तो संबंध मुंबई राज्यास लागू होईल."

(ब) पोट-कलम (४) यांत, "सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या कोणत्याहि वर्गास ज्या तारखेस लागू होतील ती तारीख निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे" या मजकुराऐवजीं, "सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या कोणत्याहि वर्गास ज्या तारखेस लागू होतील ती तारीख निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे आणि निरनिराळ्या क्षेत्रांतील अशा विश्वस्तव्यवस्थांसाठीं निरनिराळ्या तारखा निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे." हा मजकूर दाखल करावा.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ ची सुधारणा.

४. उक्त अधिनियमाचें कलम २ यांत, कंडिका (७) नंतर पुढील नवीन कंडिका दाखल कराव्यात :—

"(७-अ) 'विश्वस्तव्यवस्था लेख' या संज्ञेचा अर्थ, ज्या लेखाद्वारें विश्वस्तव्यवस्था करणारानें विश्वस्तव्यवस्था निर्माण केली तो लेख असा समजावा आणि त्यांत सक्षम प्राधिकाऱ्यानें तयार केलेल्या योजनेचा समावेश होतो ;

(७-ब) "संयुक्त चॅरिटी कमिशनर" या संज्ञेचा अर्थ, कलम ३-अ अन्वयें नेमलेला संयुक्त चॅरिटी कमिशनर असा समजावा;".

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याचें कलम २-अ गाळणें.

५. उक्त अधिनियमाचें कलम २-अ गाळण्यांत यावें.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ ची सुधारणा.

६. उक्त अधिनियमाचें कलम ३ यांत,—

(अ) "मुंबई व म्हैसूर राज्य सरकारांपैकीं प्रत्येक राज्य सरकारास" या शब्दांऐवजीं "राज्य सरकारास" हे शब्द दाखल करावे ;

(ब) "राज्याच्या ज्या भागास अधिनियम लागू आहे त्या संबंध भागांत" या मजकुराऐवजीं "संबंध राज्यांत" हा मजकूर दाखल करावा.

७. उक्त अधिनियमाच्या कलम ३ नंतर, पुढील नवीन कलम जादा दाखल करावें :—

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ यांत नवीन कलम ३-अ दाखल करणें.

"३-अ. राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, संयुक्त चॅरिटी कमिशनर या नांवाचा एक किंवा अधिक अधिकारी नेमण्याचा अधिकार आहे, व त्यांनीं, चॅरिटी कमिशनरच्या नियंत्रणास व राज्य सरकार देईल अशा सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, चॅरिटी कमिशनरच्या अधिकारांपैकीं सर्व किंवा कोणतेहि अधिकार चालविले पाहिजेत व त्याच्या कर्तव्यांपकीं व कामांपैकीं सर्व किंवा कोणतींहि कर्तव्यें व कामें पार पाडलीं पाहिजेत.". संयुक्त चॅरिटी कमिशनर.

८. उक्त अधिनियमाचें कलम ४ यांत,—

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४ ची सुधारणा.

(अ) "चॅरिटी कमिशनर म्हणून नेमावयाचा इसम" या शब्दांऐवजीं "चॅरिटी कमिशनर किंवा संयुक्त चॅरिटी कमिशनर म्हणून नेमावयाचा इसम" हा मजकूर दाखल करावा ;

(ब) समासांतील टीपेंत "चॅरिटी कमिशनर" या शब्दांनंतर "व संयुक्त चॅरिटी कमिशनर" हे शब्द आणखी दाखल करावे.

९. उक्त अधिनियमाचें कलम ५ यांत, पोट-कलम (२) ऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा :—

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

"(२) प्रति चॅरिटी कमिशनर म्हणून नेमावयाचा इसम हा पुढीलप्रमाणें पात्रता धारण करणारा इसम असला पाहिजे :—

(अ) जो दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ विभाग) किंवा मुंबईच्या लघुवाद न्यायालयाचा न्यायाधीश याच्या दर्जाहून कमी नाहीं असें न्यायिक पद किंवा राज्य सरकारच्या मतें तत्सम असलेलें कोणतेंहि पद धारण करीत असेल किंवा ज्यानें तें धारण केलें असेल असा इसम ; अथवा

(ब) आठ वर्षांपेक्षां कमी नाहीं अशा मुदतीसाठीं,—

(१) जो भारताचा बार कौंसिलांबाबत अधिनियम, १९२६ अन्वयें नोंदणी केलेला अधिवक्ता असेल असा इसम ;

(२) जो उच्च न्यायालयाचा न्यायवादी असेल असा इसम ; अथवा

(३) जो मुंबईचा वकिलांबाबत अधिनियम, १९२० अन्वयें नोंदणी केलेला वकील असेल असा इसम.

(२-अ) साहाय्यक चॅरिटी कमिशनर म्हणून नेमावयाचा इसम हा पुढील-प्रमाणें पात्रता धारण करणारा इसम असला पाहिजे :—

(अ) जो दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ विभाग) याच्या दर्जाहून कमी नाहीं असें न्यायिक पद किंवा राज्य सरकारच्या मतें तत्सम असलेलें कोणतेंहि पद चार वर्षांहून कमी नाहीं अशा मुदतीसाठीं धारण करीत असेल किंवा ज्यानें असें पद धारण केलें असेल असा इसम ; अथवा

(ब) सात वर्षांपेक्षा कमी नाहीं अशा मुदतीसाठीं,—

(१) जो भारताच्या बार कौंसिलांबाबत अधिनियम, १९२६ अन्वयें नोंदणी केलेला अधिवक्ता असेल असा इसम ;

(२) जो उच्च न्यायालयाचा न्यायवादी असेल असा इसम; अथवा

(३) जो मुंबईच्या वकिलांबाबत अधिनियम, १९२० अन्वयें नोंदणी केलेला वकील असेल असा इसम.".

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

१०. उक्त अधिनियमाचें कलम ६ यांत,—

(अ) " ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणण्यासाठीं चॅरिटी कमिशनर व प्रति कमिशनर व साहाय्यक कमिशनर यांस मदत करण्यासाठीं " या शद्बांनीं सुरू होणाऱ्या व " आवश्यक वाटतील अशा पदनामाचे निरीक्षक व इतर दुय्यम अधिकारी नेमण्याचा " या शद्बांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं, " या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणण्याच्या कारणासाठीं, राज्य सरकारला विहित केलेल्या पात्रता धारण करणारा हिशोब संचालक व साहाय्यक हिशोब संचालक, निरीक्षक व इतर दुय्यम अधिकारी नेमण्याचा " हा मजकूर दाखल करावा ;

(ब) परंतुकांत, " चॅरिटी कमिशनर " या शद्बानंतर " संयुक्त चॅरिटी कमिशनर " हे शद्ब जादा दाखल करावे.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६-अ व ६-ब ची सुधारणा.

११. उक्त अधिनियमाचीं कलमें ६-अ व ६-ब यांत,—

(अ) " चॅरिटी कमिशनर " या शद्बानंतर " संयुक्त चॅरिटी कमिशनर " हे शद्ब जादा दाखल करावे ;

(ब) " प्रति चॅरिटी कमिशनर व साहाय्यक चॅरिटी कमिशनर " या शद्बानंतर " हिशोब संचालक, साहाय्यक हिशोब संचालक " हे शद्ब जादा दाखल करावे.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम १८ ची सुधारणा.

१२. उक्त अधिनियमाचें कलम १८, पोट-कलम (७) यांत, " कलम २८-ब अन्वयें ठेवलेल्या नोंदणी पुस्तकांत नोंदणी करण्यासाठीं पुढील अधिकाऱ्यांना व प्राधिकाऱ्यांना पाठविणें हें विश्वस्ताचें कर्तव्य असेल " या शद्बांनीं सुरू होणारा व " रचना केलेली महानगरपालिका " या शद्बांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं " अशी स्थावर मालमत्ता ज्या पोट-जिल्ह्यांत असेल त्या पोट-जिल्ह्यासाठीं भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वयें नेमलेल्या सब्-रजिस्ट्रारकडे नोंदणी करण्यासाठीं पाठविणें हें त्याचें कर्तव्य असेल " हा मजकूर दाखल करावा.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २२ ची सुधारणा.

१३. उक्त अधिनियमाचें कलम २२ यांत,—

(अ) पोट-कलम (१) नंतर, पुढील नवीन पोट-कलम आणखी दाखल करावें :—

" (१-अ) पोट-कलम (१) अन्वयें कळवावयाचा फेरबदल कोणत्याहि स्थावर मालमत्तेसंबंधीं असेल त्याबाबतींत, विश्वस्तानें, प्रतिवृत्ताबरोबर, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेंतील कोणत्याहि बदला-संबंधींचा तपशील (सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचें नांव व गणन यांचा समावेश करून) असलेलें विहित केलेल्या नमुन्यांतील ज्ञापन, त्या कलम १८, पोट-कलम (७) यांत उल्लेख केलेल्या सब्-रजिस्ट्रारकडे पाठविण्यासाठीं पुरविलें पाहिजे.

विश्वस्तानें किंवा त्यानें या बाबतींत विशेष रीत्या अधिकृत केलेल्या त्याच्या अभिकर्त्यानें अशा ज्ञापनावर, विहित केलेल्या रीतीनें, सही केली पाहिजे व तें विहित केलेल्या रीतीनें, पडताळून पाहिलें पाहिजे.";

(ब) पोट-कलम (३) नंतर, पुढील नवीन पोट-कलम दाखल करावें:—

"(४) ज्या ज्या वेळीं पोट-कलम (३) अन्वयें एखाद्या नोंदीत सुधारणा करण्यांत येईल त्या त्या वेळीं, यथास्थिति, धर्मादाय आयुक्तानें किंवा साहाय्यक चॅरिटी कमिशनरनें, पोट-कलम (१-अ) अन्वयें त्याला पुरविण्यांत आलेलें ज्ञापन, सुधारलेली नोंद प्रकाशित केल्यानंतर, कलम १८, पोट-कलम (७) यांत उल्लेख केलेल्या सब्-रजिस्ट्रारकडे अशा फेरबदलाची नोंदणी करण्याच्या कारणासाठीं, पाठविलें पाहिजे.".

१४. (१) उक्त अधिनियमाचें कलम २२-क यास त्या कलमाचें पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यांत यावा आणि अशा रीतीनें नवीन क्रमांक दिलेलें पोट-कलम (१) यांत,— सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम २२-क ची सुधारणा.

(अ) कंडिका (अ) यांत, "कलम २८" या मजकुराऐवजीं "कलम २८ व अनुसूचि अ" हा मजकूर दाखल करावा;

(ब) "कलम २८-ब अन्वयें ठेवलेल्या नोंदवहींत" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या व "कलम १८, पोट-कलम (७) यांत निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांकडे व प्राधिकाऱ्यांकडे" या शब्दांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं "नोंदणीच्या कारणासाठीं कलम १८, पोट-कलम (७) मध्यें निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांकडे" हा मजकूर दाखल करावा.

(२) अशा रीतीनें नवीन क्रमांक दिलेलें पोट-कलम (१) यानंतर, पुढील नवीन पोट-कलम दाखल करावें:—

"(२) कलम २८ व अनुसूचि अअ अन्वयें ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी करण्यांत आली आहे असें समजण्यांत येत असेल त्या सार्वजनिक विश्वस्त-व्यवस्थेच्या बाबतींत, पोट-कलम (१) चे उपबंध, हे पुढीलप्रमाणें फेरफार करून लागू होतील; म्हणजे उक्त तारीख ही मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (एकसूत्रीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९, हा ज्या तारखेस अंमलांत आला ती तारीख आहे असें समजण्यांत येईल.

१५. उक्त अधिनियमाचें कलम २८, पोट-कलम (१) यांत, "अनुसूचि अ" या मजकुरानंतर "अनुसूचि अअ" हा मजकूर दाखल करावा. सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २८ ची सुधारणा.

१६. उक्त अधिनियमाचें कलम २८-अ यांतील कंडिका (२) व (३) गाळण्यांत याव्या. सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २८-अ ची सुधारणा.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम २८-ब गाळणें.

१७. उक्त अधिनियमाचें कलम २८-ब गाळण्यांत यावें.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम ३२ ची सुधारणा.

१८. उक्त अधिनियमाचें कलम ३२, पोट-कलम (१) यांत, "या अधिनियमान्वयें जो नोंदलेला आहे" हे शब्द गाळण्यांत यावे.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम ३५ ची सुधारणा.

१९. उक्त अधिनियमाचें कलम ३५, पोट-कलम (२) च्या परंतुकांतील, "मिळालेली" या शब्दाऐवजीं "अशा रीतीनें गुंतविलेल्या किंवा अनामत ठेवलेल्या" हा मजकूर दाखल करावा.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम ३६ ची सुधारणा.

२०. उक्त अधिनियमाचें कलम ३६ यांत, "विश्वस्तव्यवस्थेच्या लेखांतील सूचनांना अधीन राहून" या मजकुराऐवजीं "विश्वस्तव्यवस्थेच्या लेखांत कांहींहि असलें तरी" हा मजकूर दाखल करावा.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम ३७ ची सुधारणा.

२१. उक्त अधिनियमाचें कलम ३७ यास त्या कलमाचें पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यांत यावा आणि अशा रीतीनें नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर पुढील नवीन पोट-कलम दाखल करावें:—

"(२) पोट-कलम (१) अन्वयें कोणतेहि अधिकार चालविणाऱ्या कोणत्याहि अधिकाऱ्यास सर्व वाजवी सवलती देणें हें प्रत्येक विश्वस्ताचें कर्तव्य असेल आणि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा ताबा असलेल्या विश्वस्तानें किंवा कोणत्याहि इतर असामीनें, अशा अधिकाऱ्यानें पोट-कलम (१) अन्वयें किंवा तदनुसार त्याजकडे सोंपविलेला अधिकार चालवून दिलेला कोणताहि आदेश किंवा काढलेला निदेश याचें पालन केलें पाहिजे.".

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम ४३ ची सुधारणा.

२२. उक्त अधिनियमाचें कलम ४३ यांत,—

(अ) "(१)" हा कंस व आंकडा गाळण्यांत यावा.

(ब) पोट-कलम (२) गाळण्यांत यावें.

२३. उक्त अधिनियमाचें कलम ४७ नंतर पुढील नवीन कलम जादा दाखल करावें :— सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ यांत नवीन कलम ४७-अअ जादा दाखल करणें.

"४७-अअ. कोणत्याहि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्तास या अधिनियमान्वयें शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यांत आलें असेल त्याबाबतींत, चॅरिटी कमिशनर यास नवीन विश्वस्ताची नेमणूक करण्याबाबत न्यायालयाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे व त्यानंतर कलम ४७ चीं पोट-कलमें (३), (४), (५) व (६) यांचे उपबंध हे, त्या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वयें केलेल्या अर्जास ज्याप्रमाणें लागू असतात त्याचप्रमाणें लागू होतील.". विश्वस्तास या अधिनियमान्वयें दोषी ठरविण्यांत आलें असेल त्याबाबतींत नवीन विश्वस्ताची नेमणूक करण्याबाबत न्यायालयाकडे अर्ज करण्याचा चॅरिटी कमिशनरचा अधिकार.

२४. उक्त अधिनियमाचें कलम ४७-अ यांत "४७" या आंकड्यानंतर "किंवा कलम ४७-अअ" हा मजकूर दाखल करावा. सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम ४७-अ ची सुधारणा.

२५. उक्त अधिनियमाचें कलम ४७-ब यांत "किंवा ४७" या मजकुराऐवजीं "४७ किंवा ४७-अअ" हा मजकूर दाखल करावा. सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम ४७-ब ची सुधारणा.

२६. उक्त अधिनियमाचें कलम ५० यांत,— सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम

(अ) कंडिका (२) मध्यें, "विशिष्ट मालमत्ता ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीची मालमत्ता आहे असें प्रज्ञापन आवश्यक असेल" व "अशा मालमत्तेचा कबजा मिळविण्याकरितां निदेश आवश्यक असेल" हा मजकूर गाळण्यांत यावा आणि "अशा मालमत्तेचा कबजा मिळविण्याकरितां निदेशाची

५० ची सुधारणा.

आवश्यकता असेल" या मजकुराऐवजीं "सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या मालमत्तेचा कबजा मिळविण्यासाठीं निदेश आवश्यक असेल." हा मजकूर दाखल करावा,

(ब) "चॅरिटी कमिशनरास" हे शब्द जेथें येतात तेथें त्यानंतर "त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर" हा मजकूर दाखल करावा, आणि

(क) शेवटच्या परंतुकानंतर पुढील परंतूक दाखल करावें:—

"तसेंच, चॅरिटी कमिशनरास, दावा दाखल करण्याऐवजीं, आधींच निश्चित केलेल्या योजनेंत बदल किंवा फरकार करण्यासाठीं न्यायालयाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.".

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ यांत नवीन कलम ५०-अ दाखल करणें.

२७. उक्त अधिनियमाचें कलम ५० यानंतर पुढील नवीन कलम दाखल करावें:—

योजना तयार करण्याचा, त्यांचें एकीकरण करण्याचा, किंवा त्यांचें रूपांतर करण्याचा, चॅरिटी कमिशनरचा अधिकार.

"५०-अ. (१) कलम ५० यांत कोणताहि मजकूर असला तरी, चॅरिटी कमिशनर यास सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची योग्य व्यवस्था किंवा तिचा योग्य कारभार ठेवण्याच्या दृष्टीनें त्यासाठीं एक योजना निश्चित करावी असें वाटण्यास कारण असेल त्याबाबतींत किंवा एखाद्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेंत हितसंबंध असणाऱ्या दोन किंवा अधिक इसमांनीं सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची योग्य व्यवस्था किंवा तिचा योग्य कारभार ठेवण्याच्या दृष्टीनें त्यासाठीं एक योजना निश्चित करावी याबाबत त्याजकडे विहित केलेल्या रीतीनें लेखी अर्ज केला असेल त्याबाबतींत, चॅरिटी कमिशनर यास, जर, अशा विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्तांना त्यांची बाजू मांडण्याची योग्य संधि दिल्यानंतर तसें करणें आवश्यक किंवा इष्ट आहे अशी त्याची खात्री होईल तर अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या व्यवस्थेसाठीं किंवा कारभारासाठीं योजना तयार करण्याचा अधिकार आहे.

(२) योग्य व्यवस्था किंवा कारभार चालविण्याच्या दृष्टीनें, दोन किंवा अधिक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांसाठीं एक संयुक्त योजना तयार करून त्यांचें एकीकरण करतां येईल असें चॅरिटी कमिशनरचें मत असेल तर, त्यास,—

(अ) राजपत्रांत आणि तसेंच विश्वस्तव्यवस्थेची ज्या विभागांत नोंदणी करण्यांत आली असेल त्या विभागांत मोठ्या प्रमाणांत खप असलेल्या (एक इंग्रजी भाषेंत व त्या विभागाच्या इतर भाषेंतील) अशा किमान दोन वर्तमानपत्रांत नोटीस प्रसिद्ध करून, आणि

(ब) अशा विश्वस्तव्यवस्थांचे विश्वस्त आणि हितसंबंध असलेल्या इतर सर्व इसमांना आपली बाजू मांडण्याची योग्य संधि दिल्यानंतर,

त्या विश्वस्तव्यवस्थांसाठीं एक संयुक्त योजना तयार करण्याचा अधिकार आहे.

(३) चॅरिटी कमिशनर यास, कोणत्याहि वेळीं, विश्वस्तांची बाजू ऐकून घेतल्यानंतर, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वयें त्यानें तयार केलेल्या योजनेंत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये तयार केलेली किंवा पोट-कलम (३) अन्वयें बदलण्यांत आलेली योजना ही सक्षम न्यायालयाच्या कलम ७२ अन्वयेंच्या निर्णयास अधीन राहून, कलम ५० अन्वयेंच्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वयें "यथास्थिति, निश्चित केलेल्या किंवा बदल केलेल्या योजनेप्रमाणें अंमलांत असेल.".

२८. उक्त अधिनियमाचें कलम ५६-ब यांत, पोट-कलम (३) मध्यें, "हा अधिनियम ज्या प्रदेशांत लागू असेल त्या प्रदेशांत" या मजकुराऐवजीं "मुंबई राज्यांत" हे शब्द दाखल करावे.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५६-ब ची सुधारणा.

२९. उक्त अधिनियमाचें कलम ५६-ब यानंतर, पुढील नवीन विभाग जादा दाखल करण्यांत यावा:—

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, यांत नवीन विभाग ७-अ दाखल करणें.

"विभाग ७-अ

राज्य सरकारकडे निहित असलेल्या किंवा ज्यांची व्यवस्था राज्य सरकारकडे निहित केलेली आहे अशा धार्मिक व धर्मादाय स्वरूपाच्या संस्था आणि देणग्या यांच्या संबंधांत खास उपबंध.

विभाग ७-अ चे उपबंध विवक्षित देणग्यांना लागू असणें.

५६-क. (१) या विभागाचे उपबंध, राज्य सरकारकडे निहित असलेल्या किंवा ज्यांची व्यवस्था राज्य सरकारकडे निहित केलेली आहे अशा, आणि—

(अ) या अधिनियमाच्या उपबंधान्वयें सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था म्हणून नोंदण्यांत आलेल्या, किंवा

(ब) राज्य सरकारनें, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि आगाऊ प्रसिद्ध केल्यानंतर सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था असल्याचें जाहीर करण्यांत आलेल्या, प्रत्येक देवळास, मशिदीस किंवा सार्वजनिक धार्मिक किंवा धर्मादाय स्वरूपाच्या कारणाकरितां निर्माण केलेल्या देणगीस (जिला यापुढें या विभागांत 'देणगी' म्हटलें आहे) लागू असतील.

असें जाहीर करण्यांत आल्यानंतर, अशी देणगी या अधिनियमाच्या कारणांकरितां नोंदणी केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहे असें समजण्यांत आलें पाहिजे आणि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणीसंबंधींचें विभाग ४ चे उपबंध, शक्य असेल तेथवर, कलम १७ अन्वयें ठेवलेल्या नोंदणीपुस्तकांत नोंदी करण्यास लागू असतील ; मात्र, अशा नोंदी या विभागाच्या उपबंधांशीसुद्धां जुळत्या असल्या पाहिजेत. अशा प्रकारें केलेल्या नोंदी ह्या अखेरच्या व निर्णायक असतील.

(२) राज्य सरकारनें, या विभागाच्या सुरुवातीनंतर, शक्य असेल तितक्या लवकर, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था म्हणून नोंदणी केलेल्या किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था असल्याचें जाहीर केलेल्या देणग्यांची एक यादी राजपत्रांत प्रसिद्ध

केली पाहिजे ; व राज्य सरकारास, तशीच अधिसूचना काढून आणि तशाच रीतीनें, अशा यादींत कोणतीहि देणगी जादा दाखल करण्याचा किंवा तींत दाखल केलेली कोणतीहि देणगी अशा यादींतून काढून टाकण्याचा अधिकार आहे.

विवक्षित देणग्या निहित करणें किंवा त्यांची व्यवस्था हस्तांतरित करणें.

५६-ड. राज्य सरकारनें, तें ठरवील त्या तारखेपासून, आणि यांत यापुढें तरतूद केलेल्या रीतीनें, एखाद्या समितीकडे (जिला यांत यापुढें 'समिति' असें म्हटलें आहे) उक्त देणगी किंवा तिची व्यवस्था, हस्तांतरित केली पाहिजे आणि त्यानंतर अशी देणगी व तिला लागून असलेली सर्व स्थावर किंवा जंगम मालमत्ता किंवा यथास्थिति, तिची व्यवस्था अशा समितीकडे निहित होईल ; आणि उक्त समितीचे सदस्य, ह्या अधिनियमाच्या अर्थाप्रमाणें आणि कारणांकरितां, अशा देणगीचे विश्वस्त म्हणून असतील.

व्यवस्थे-संबंधीच्या समित्या.

५६-इ. (१) कलमें ४७ व ५० यांत कोणताहि मजकूर असला तरीहि, या विभागाच्या उपबंधान्वयें समितीकडे देणगी निहित करण्याच्या किंवा तिची व्यवस्था हस्तांतरित करण्याच्या कारणांकरितां, राज्य सरकारनें, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून (अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा नांवानें) प्रत्येक जिल्ह्याकरितां एक किंवा अनेक समित्या नेमल्या पाहिजेत.

(२) समितीस विहित करण्यांत येतील अशा शर्तींना व निर्बंधांना पात्र राहून, मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा आणि तिची विल्हेवाट लावण्याचा अधिकार असेल आणि आपल्या सर्व सदस्यांच्या नांवानें, तिला व तिजवर दावा करण्याचा अधिकार असेल.

(३) समितींत, पांचांहून कमी नाहींत व सातांहून जास्त नाहींत इतके सदस्य असतील, आणि धार्मिक देणगीच्या बाबतींत अशा सदस्यांची नेमणूक, जे इसम आपण त्या धर्माचे आहोंत असें सांगतात किंवा जे, ज्या धार्मिक संप्रदायाच्या कारणाकरितां किंवा ज्याच्या फायद्याकरितां देणगी बनविण्यांत आली होती व तिचा कारभार पहाण्यांत येत आहे त्या धार्मिक सांप्रदायाचे (किंवा त्याच्या कोणत्याहि पंथाचे) आहेत त्या इसमांमधून केली पाहिजे आणि इतर बाबतींत अशा प्रकारें नेमणूक करण्याचा अधिकार असेल. अशा सदस्यांची नेमणूक, शक्य असेल तेथवर, आणि अशा देणगीच्या कारभारांत हितसंबंध असलेल्या इसमांची सर्वसाधारण इच्छा काय आहे याची खात्री करून घेतां येईल तेथवर त्यांच्या इच्छेप्रमाणें केली पाहिजे.

समितीच्या सदस्यांच्या पदाची मुदत.

५६-फ. (१) एखाद्या सदस्याची समितीवर पांच वर्षें मुदतीसाठीं नेमणूक करण्यांत येईल, परंतु तो, पुन्हा नेमणूक केली जाण्यास पात्र असेल.

(२) एखाद्या सदस्यास, त्यानें राज्य सरकारास उद्देशून स्वहस्तें लिहिलेल्या पत्राद्वारें, आपल्या समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्याचा अधिकार आहे :

परंतु, राज्य सरकारकडून असा राजीनामा स्वीकारण्यांत येईपर्यंत तो राजीनामा अंमलांत येणार नाहीं.

सदस्यत्वा-साठीं अपात्रता.

५६-ग. (१) जर—

(अ) एखादा इसम अवयस्क असेल;

(ब) एखाद्या इसमास फौजदारी न्यायालयांत, नैतिक अधःपतन असलेल्या कोणत्याहि अपराधाबाबत दोषी ठरविण्यांत आलें असेल;

(क) एखादा इसम विकृतचित्त असेल आणि सक्षम न्यायालयानें तो तसा असल्याबद्दल जाहीर केलें असेल;

(ड) एकादा इसम अमुक्त नादार असेल ;

(इ) समितीकडे निहित झालेल्या मालमत्तेसंबंधींच्या पट्टयांत किंवा कोणत्याहि इतर व्यवहारांत एकाद्या इसमाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असेल ;

(फ) एकादा इसम समितीचा पगारी नोकर असेल आणि देणगीच्या संबंधांत समितीला मालाचा पुरवठा करण्यासाठीं किंवा समितीनें हातीं घेतलेलीं कोणतींहि कामें पार पाडण्यासाठीं किंवा कोणतीहि कामगिरी करण्यासाठीं केलेल्या करारांत त्याचा कोणताहि हिस्सा किंवा हितसंबंध असेल ;

(ग) एकादा इसम गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचें राज्य सरकारास आढळून आलें असेल;

(ह) धार्मिक देणगीच्या बाबतींत एकादा इसम, तो त्या धर्माचा अनुयायी राहिला नसेल किंवा ज्या धार्मिक सांप्रदायासाठीं समिति नेमण्यांत आली त्या धार्मिक सांप्रदायाचा असण्याचें बंद झाला असेल; किंवा

(आय्) एकादा इसम इतर रीतीनें अयोग्य असेल,

तर समितीचा सदस्य म्हणून नेमणूक केली जाण्यास किंवा सदस्य असण्यास अपात्र होईल.

(२) एकाद्या सदस्यास उपरोक्त अपात्रतांपैकीं कोणतीहि अपात्रता प्राप्त झाली आहे असें राज्य सरकारास वाटेल तर राज्य सरकारास, अशा सदस्यास कारण दर्शविण्याची संधि दिल्यानंतर आणि दर्शविण्यांत आलेलें कोणतेंहि असें कारण विचारांत घेतल्यानंतर, अशा इसमाचें सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार आहे आणि राज्य सरकारचा निर्णय अखेरचा असेल.

(३) त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि अन्य विधींत कांहींहि असलें तरीहि, समितीचा एकादा सदस्य, तो अशा समितीचा सदस्य आहे याच केवळ कारणास्तव मुंबई विधानसभेचा किंवा मुंबई विधानपरिषदेचा किंवा कोणत्याहि स्थानिक प्राधिकारी संस्थेचा सदस्य म्हणून त्याची निवड केली जाण्यास किंवा सदस्य असण्यास अपात्र असणार नाहीं.

५६-ह. जर समितीचा एकादा सदस्य,— (नवीन सदस्याची नेमणूक करण्याचा सरकारचा अधिकार.)

(अ) राजीनामा देईल किंवा मरण पावेल ;

(ब) सतत सहा महिन्यांच्या मुदतींत चॅरिटी कमिशनरच्या परवानगीवांचून भारतांतून गैरहजर असेल ;

(क) परदेशांत राहण्याच्या कारणाकरितां भारत सोडून जाईल ;

(ड) मुक्त होण्याची इच्छा व्यक्त करील ;

(इ) काम करण्याचें नाकारील ; किंवा

(फ) राज्य सरकारकडून त्यास पदावरून दूर करण्यांत येईल,

तर राज्य सरकारास नवीन सदस्याची नेमणूक करण्याचा अधिकार असेल.

५६-आय्. (१) राज्य सरकारनें, समितीच्या सदस्यांमधून अध्यक्षाची नेमणूक केली पाहिजे आणि त्याचप्रमाणें त्यानें खजीनदाराचीहि नेमणूक केली पाहिजे. (समितीचा अध्यक्ष व खजिनदार.)

(२) समितीच्या अध्यक्षास, खजीनदारास व इतर सदस्यांस विहित करण्यांत येईल अशा निधींतून व विहित करण्यांत येईल अशा रीतीनें सन्मान वेतन किंवा फी व भत्ते देण्यांत यावेत असें फर्माविण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे.

**समितीची सभा व कार्यरीति.**

५६-जे. समितीनें विहित करण्यांत येईल अशा अंतराअंतरानें सभा बोलविली पाहिजे व तिचे अधिकार चालवितांना आणि तिचीं कर्तव्यें सभा व कामें पार पाडतांना विहित करण्यांत येईल अशी कार्यरीति अनुसरली पाहिजे; परंतु रोजचें व नित्याचें कामकाज तिनें केलेल्या व राज्य सरकारची मान्यता मिळालेल्या विनियमांनुसार पाठविण्यांत आलें पाहिजे.

**उप-समित्या नेमण्याचा समितीचा अधिकार.**

५६-के. समितीस, ठराव करून, तिला योग्य वाटतील अशा उप-समित्या नेमण्याचा अधिकार आहे आणि तिला, ती ठरावांत निर्दिष्ट करील असे अधिकार व कर्तव्यें त्यांजकडे सोंपविण्याचा अधिकार आहे; आणि समितीला किंवा उप-समितीला, सामान्यपणें किंवा कोणत्याहि विशिष्ट कारणाकरितां सदस्य नसलेल्या परंतु ज्याची मदत किंवा सल्ला घेण्याची तिची इच्छा असेल अशा कोणत्याहि इसमाशीं विनियमांवरून ठरविण्यांत येईल अशा रीतीनें संपर्क ठेवण्याचा अधिकार आहे; आणि उपरोक्त प्रमाणें ज्या इसमाशीं संपर्क ठेवण्यांत आला असेल त्या इसमास, त्या कारणाशीं संबंधित अशा समितीच्या किंवा उप-समितीच्या चचत भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु त्यास तिच्या कोणत्याहि सभेंत मत देण्याचा हक्क असणार नाहीं.

**समितीचे चिटणीस व इतर अधिकारी.**

५६-ल. (१) राज्य सरकारास समितीचा चिटणीस नेमण्याचा अधिकार आहे;

(२) समितीस या अधिनियमाखालील आपलीं कर्तव्यें व कामें कार्यक्षम रीतीनें पार पाडण्यासाठीं तिला आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (चिटणिसा व्यतिरिक्त) व नोकरांची नेमणूक करण्याचा अधिकार आहे:

परंतु ज्याला दर महा शंभर रुपयांहून अधिक पगार देण्यांत येतो किंवा द्यावयाचा असेल अशा कोणत्याहि नोकराची नेमणूक समितीनें राज्य सरकारची पूर्व संमति घेतल्याशिवाय करतां कामा नये.

**चिटणीस व इतर नोकर यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती.**

५६-म. (१) यथास्थिति, समितीनें केलेल्या नियमांवरून किंवा विनियमांवरून ठरविण्यांत येतील अशा नोकरीच्या अटींवर व शर्तींवर चिटणीस, अधिकारी, नोकर यांची नेमणूक करण्यांत आली पाहिजे.

(२) समितीचा चिटणीस, अधिकारी व नोकर यांचा पगार व भत्ते विहित करण्यांत येईल अशा निधींतून दिले पाहिजेत.

**समितीचीं सामान्य कर्तव्यें.**

५६-न. (१) राज्य सरकारच्या सामान्य आणि खास आदेशांना पात्र ठेवून, जी देणगी समितीकडे निहित झाली असेल [illegible] जिची व्यवस्था तिच्याकडे निहित झाली असेल अशा देणगीच्या कामकाजाची व्यवस्था पाहणें व तिचा कारभार चालविणें हें समितीचें सामान्य कर्तव्य असेल. या अधिनियमावरून किंवा त्यान्वयें किंवा अशा देणगीच्या संबंधांत त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याहि लेखान्वयें किंवा योजनेन्वयें समितीला दिलेले अधिकार आणि तिच्यावर लादलेलीं कर्तव्यें व कामें, अशी देणगी योग्य तऱ्हेनें सुस्थितींत ठेवली आहे, तिचें नियंत्रण करण्यांत येत आहे आणि तिचा कारभार चालविण्यांत येत आहे आणि ज्या उद्देशांकरितां व कारणांकरितां ती निर्माण केली होती, बनविली होती किंवा तिचा कारभार पाहण्यांत येत आहे त्या उद्देशांसाठीं व कारणांसाठीं तिच्या उत्पन्नाचा विनियोग केला जातो याची खात्री होईल अशा रीतीनें चालविले पाहिजेत व पार पाडलीं पाहिजेत.

(२) विशेषेंकरून परंतु खालील उपबंधांच्या सामान्यतेस बाध न येतां, समितीनें—

(अ) अशी प्रत्येक देणगी मूळ कोणी दिली, तिचें उत्पन्न, तिचा हेतू व तिचे हिताधिकारी यांच्या संबंधींची माहिती असलेली कागदपत्रें सुव्यवस्थित ठेवलीं पाहिजेत;

(ब) तिचें उत्पन्न व खर्च यांचें अंदाजपत्रक तयार केलें पाहिजे ;

(क) विहित करण्यांत येईल अशा निधींतून समितीच्या चिटणिसास, अधिकाऱ्यांस व नोकरांस द्यावयाचे पगार व भत्ते आणि इतर रकमा नियमितपणें दिल्या पाहिजेत ;

(ड) अशा प्रत्येक देणगीचे स्वतंत्र हिशोब ठेविले पाहिजेत ;

(इ) देणगीचें उत्पन्न व मालमत्ता ही अशी देणगी ज्या उद्देशांकरितां व कारणांकरितां निर्माण करण्यांत आली असेल, बनविण्यांत आली किंवा तिचा कारभार पहाण्यांत येत असेल त्याच उद्देशांकडे व कारणांकडे लावण्यांत येतात याविषयीं खात्री करून घेतली पाहिजे ;

(फ) अशा कोणत्याहि देणगीची हरवलेली मालमत्ता परत मिळविण्यासाठीं उपाययोजना केली पाहिजे ;

(ग) अशा देणगीच्या संबंधांत न्यायालयांत कोणतेही दावे व कामकाज दाखल केलें पाहिजे व त्यांचा प्रतिवाद केला पाहिजे ;

(ह) अशा देणगीच्या संबंधांत राज्य सरकार वेळोवेळीं फर्मावील अशीं पत्रकें, आंकडेवार माहिती, हिशोब व इतर माहिती पुरविली पाहिजे ;

(आय्) अशा देणगीच्या मालमत्तेची तपासणी केली पाहिजे किंवा तपासणी करावयास लावली पाहिजे ; आणि

(जे) अशा देणगीवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठीं, ती सुस्थितींत ठेवण्यासाठीं व तिचा कारभार पाहण्यासाठीं आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी सामान्यपणें केल्या पाहिजेत.

**५६-ओ.** समितीचें कोणतेंहि कृत्य किंवा कामकाज हें, तिच्या सदस्यांमध्यें कोणतीहि रिकामी जागा होती किंवा तिच्या घटनेंत कोणताहि दोष आहे याच केवळ कारणामुळें अवैध होणार नाहीं.

जागा रिकामी झाल्याच्या किंवा दोष असल्याच्या कारणामुळें समितीचें कृत्य अवैध नसणें.

**५६-पी.** राज्य सरकारास, वेळोवेळीं, कोणत्याहि देणगीच्या अधिक चांगल्या व्यवस्थेसाठीं किंवा कारभारासाठीं समितीस निदेश देण्याचा अधिकार आहे.

निदेश देण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

**५६-क्यू.** या अधिनियमाच्या किंवा त्यान्वयें केलेल्या नियमांच्या उपबंधांन्वयें किंवा त्यानुसार दिलेल्या निदेशांन्वयें जें कोणतेंहि कर्तव्य बजाविण्यास समिति बांधलेली असेल तें कर्तव्य तिनें पार पाडण्यासाठीं चॅरिटी कमिशनरास, राज्य सरकारच्या पूर्व संमतीनें, तरतूद करण्याचा अधिकार आहे, आणि समितीच्या मालकीचा कोणताहि भाग निधि वेळोवेळीं ज्या कोणत्याहि इसमाच्या ताब्यांत असेल त्या इसमानें असें कर्तव्य पाडण्याचा

समितीचीं कर्तव्यें बजाविण्यास भाग पाडण्याचा

व त्या संबंधींचा खर्च समिति वगैरेंच्या निधींतून देण्याविषयीं फर्माविण्याचा चॅरिटी कमिशनराचा अधिकार.

बजाविण्याचा खर्च दिला पाहिजे असें फर्माविण्याचा त्यास अधिकार आहे. जर असें कर्तव्य कोणत्याहि देणगीच्या संबंधांतील असेल तर, खर्चाची रक्कम उक्त देणगीच्या मालकीच्या निधींतून दिली पाहिजे.

समिति रद्द करण्याचा अधिकार.

५६-आर. (१) जर राज्य सरकारचें असें मत असेल कीं, समिति, या अधिनियमान्वयें किंवा त्यान्वयें तिच्यावर लादलेलीं कर्तव्यें बजाविण्यास असमर्थ आहे किंवा तीं बजाविण्यांत तिनें वारंवार कसूर केली आहे किंवा तिनें आपल्या अधिकारांचें अतिक्रमण केलें आहे किंवा त्यांचा दुरुपयोग केला आहे तर, राज्य सरकारास, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, अशा अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा मुदतीकरितां समिति रद्द करण्याचा अधिकार आहे:

परंतु या पोट-कलमान्वयें अधिसूचना काढण्यापूर्वीं, राज्य सरकारनें, अशी समिति कां रद्द करण्यांत येऊं नये याचें कारण दर्शविण्याची समितीस वाजवी संधि दिली पाहिजे व समितीनें दिलेलें स्पष्टीकरण व घेतलेल्या हरकती, कोणत्याहि असल्यास, त्या विचारांत घेतल्या पाहिजेत.

(२) समिति रद्द करण्याबाबत पोट-कलम (१) अन्वयें अधिसूचना प्रसिद्ध केल्यावर—

(अ) समितीच्या सर्व सदस्यांनीं, समिती रद्द केल्याच्या तारखेपासून, असे सदस्य म्हणून आपलीं पदें रिकामीं केलीं पाहिजेत.

(ब) या अधिनियमाच्या उपबंधांवरून किंवा त्यान्वयें समितीनें किंवा तिच्या वतीनें चालवावयाचे किंवा बजावावयाचे सर्व अधिकार, कर्तव्यें व कामें हीं, (समिति) रद्द असल्याच्या मुदतींत, राज्य सरकार, कलम ५६-ग पोट-कलम (१) चे उपबंध लक्षांत घेऊन फर्मावील अशा इसमानें किंवा इसमांनीं चालविले किंवा बजाविलीं पाहिजेत; आणि

(क) समितिकडे निहित असलेली सर्व मालमत्ता किंवा जिची व्यवस्था तिच्याकडे निहित असेल ती मालमत्ता, रद्द असल्याच्या मुदतींत राज्य सरकारकडे निहित असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वयें काढलेल्या अधिसूचनेंत समिती रद्द करण्या संबंधांत जी मुदत निर्दिष्ट केली असेल ती मुदत संपल्यावर, राज्य सरकारास—

(अ) त्यास आवश्यक वाटेल अशा आणखी मुदतीपर्यंत रद्द असण्याची मुदत वाढविण्याचा, किंवा

(ब) कलम ५६-इ मध्यें तरतूद केलेल्या रीतीनें समितीची पुनर्घटना करण्याचा अधिकार आहे.

विनियम करण्याचा अधिकार.

५६-एस्. (१) समितीस राज्य सरकारची संमति घेऊन, या अधिनियमान्वयेंचीं आपलीं कामें पार पाडण्यासाठीं, या अधिनियमाशीं किंवा त्यान्वयें केलेल्या नियमांशीं विसंगत नसतील असे विनियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, परंतु मागील उपबंधांच्या सर्व सामान्यतेस बाध न येतां, अशा विनियमांत, पुढील बाबींपैकीं सर्व किंवा कोणत्याहि बाबींची तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(१) कलम ५६-जे अन्वयेचें समितीचें रोजचें कामकाज व नित्याचें काम पाठविणें ;

(२) कलम ५६-के अन्वयें, यथास्थिति, समितीचा किंवा उप-समितीचा सदस्य नसलेल्या कोणत्याहि इसमाशीं ज्या रीतीनें, अशा समितीनें किंवा उपसमितीनें संपर्क ठेवावा ती रीत ;

(३) कलम ५६-म अन्वयेंच्या समितीच्या नोकरांच्या नोकरीच्या अटी व शर्ती.

५६-टी. या विभागाच्या उपबंधांत स्पष्टपणें तरतूद केली असेल तेथवर तें खेरीजकरून, या अधिनियमाचे कलमें १८, १९, २०, २१, ४४, ४५, ४६, ४७, ४७-अ, ४७-ब, ५०, ५९, ६६ व ६७ यांतील कोणताहि मजकूर, ज्या देणग्यांस हा विभाग लागू आहे त्या देणग्यांस लागू असणार नाहीं.".

अधिनियमाचे विवक्षित उपबंध देणग्यांस लागू नसणें.

३०. उक्त अधिनियमाचें कलम ५७ मधील पोट-कलम (१) ऐवजीं पुढील पोट-कलम दाखल करण्यांत यावें :—

"(१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था प्रशासन निधि या नांवें ओळखला जाणारा एक निधि स्थापन करण्यांत आला पाहिजे. उक्त निधि चॅरिटी कमिशनरकडे निहित असेल".

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ५७ ची सुधारणा.

३१. उक्त अधिनियमाच्या कलम ६१ मधील, :—

(अ) "अनुसूचि अ" या मजकुरानंतर "अनुसूची अअ" हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(ब) "राज्य सरकारास असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं," या मजकुरानंतर "चॅरिटी कमिशनरानें, अशा कोणत्याहि अधिनियमान्वयें येणें असलेली कोणतीहि थकबाकी वसूल केली पाहिजे आणि ती" हा मजकूर दाखल करावा.

(क) "तिचा कोणताहि भाग" ह्या मजकुरापूर्वी, "चॅरिटी कमिशनरनें वसूल केलेली थकबाकी धरून" हा मजकूर दाखल करण्यांत यावा.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ६१ ची सुधारणा.

३२. उक्त अधिनियमाच्या कलम ६३ मधील, "प्रति चॅरिटी कमिशनरानें" या शब्दांऐवजीं "चॅरिटी कमिशनरानें किंवा प्रति चॅरिटी कमिशनरानें" हा मजकूर दाखल करण्यांत यावा.

सन १९५०चा अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ६३ ची सुधारणा.

३३. उक्त अधिनियमाच्या कलम ६५ मधील:—

(अ) पोट-कलम (१) मधील "प्रति चॅरिटी कमिशनर" या शब्दांऐवजीं, "चॅरिटी कमिशनर किंवा प्रति चॅरिटी कमिशनर" हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

सन १९५०चा अधिनियम क्रमांक २९, याचें कलम

६५ ची सुधारणा.

(ब) पोट-कलम (४) मधील,—

(१) "प्रति चॅरिटी कमिशनर" या शब्दांऐवजीं "चॅरिटी कमिशनर किंवा प्रति चॅरिटी कमिशनर" हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(२) "त्यानें ती चौकशी पुरी केली पाहिजे व" या मजकुरानंतर "प्रति चॅरिटी कमिशनरानें किंवा साहाय्यक चॅरिटी कमिशनरानें चौकशी केली असेल त्याबाबतींत त्यानें" हा मजकूर दाखल करण्यांत यावा.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ६७ ची सुधारणा.

३४. उक्त अधिनियमाचें कलम ६७ मधील, "या अधिनियमान्वयें विशिष्ट शास्तीची तरतूद केलेली नसेल अशा नियमांचें उल्लंघन करील" या मजकुरानंतर "किंवा चॅरिटी कमिशनर, संयुक्त चॅरिटी कमिशनर किंवा प्रति चॅरिटी कमिशनर किंवा साहाय्यक चॅरिटी कमिशनर यानें ह्या अधिनियमाच्या उपबंधांन्वयें दिलेल्या कोणत्याहि आदेशाचें किंवा दिलेल्या निदेशांचें पालन करण्यांत वाजवी कारणाशिवाय कसूर करील" हा मजकूर दाखल करण्यांत यावा.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ६८ ची सुधारणा.

३५. उक्त अधिनियमाचें कलम ६८ मधील, कंडिका (क) नंतर पुढील नवीन कंडिका दाखल करण्यांत यावी :—

"(कक) कलम २८-अ अन्वयें ज्ञापन पाठविणें" ;

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ६९ ची सुधारणा.

३६. उक्त अधिनियमाचें कलम ६९ मधील कंडिका (ल) नंतर पुढील नवीन कंडिका दाखल करण्यांत यावी :—

"(लल) कलम ५०-अ अन्वयें योजना तयार करण्याचा किंवा तींत फेरफार करण्याचा अधिकार ;"

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ७२ ची सुधारणा.

३७. उक्त अधिनियमाचें कलम ७२ मध्यें :—

(अ) पोट-कलम (१) मधील "४१" या आंकड्यानंतर "५०-अ" मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(ब) अखेरीस पुढील स्पष्टीकरण जोडण्यांत यावें :—

"स्पष्टीकरण.—ह्या कलमांतील "निर्णय" या शब्द प्रयोगांत कलम ५०-अ अन्वयें तयार केलेल्या किंवा फेरफार केलेल्या योजनेचा समावेश होईल."

(क) सामासिक टीपेंतील "४१ किंवा ७०" या मजकुराऐवजीं "४१, ५०-अ, ७० किंवा ७०-अ" हा मजकूर दाखल करण्यांत यावा.

३८. उक्त अधिनियमाचें कलम ७६ मधील सामासिक टीपेंतील " या अॅक्टान्वयें " या मजकुरानंतर " न्यायालयापुढें " हा मजकूर दाखल करण्यांत यावा. सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ७६ ची सुधारणा.

३९. उक्त अधिनियमाचें कलम ८४ मधील, पोट-कलम (२) मध्यें,— सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, याचें कलम ८४ ची सुधारणा.

(अ) कंडिका (अ) नंतर पुढील नवीन कंडिका दाखल करण्यांत यावी :—

" (अअ) कलम ६ अन्वयें नेमलेल्या हिशेब संचालकाच्या व साहाय्यक हिशेब संचालकांच्या, पात्रता ; "

(ब) " कलम २८-ब अन्वयें चालू राखण्यांत आलेल्या नोंद वहींत नोंदणी करण्यासाठीं ज्या नमुन्याप्रमाणें विश्वस्तांनीं आणि प्रति चॅरिटी कमिशनरनें व साहाय्यक चॅरिटी कमिशनरनें ज्ञापन पाठवावयाचा तो नमुना अशा नोंद वह्या ज्या रीतीनें चालू राखण्यांत आल्या पाहिजेत ती रीत आणि अशा नोंद वह्यांची तपासणी करण्यासाठीं आणि अशा नोंद वह्यांतून उतारे घेण्यासाठीं द्यावयाची फी ; " या मजकुराऐवजीं, " नोंदणीसाठीं विश्वस्तांनीं आणि प्रति व साहाय्यक चॅरिटी कमिशनरानें पाठवावयाच्या ज्ञापनाचा नमुना आणि ज्ञापनावर ज्या रीतीनें सही करण्यांत आली पाहिजे आणि ज्या रीतीनें त्यांची तपासणी केली पाहिजे ती रीत " हा मजकूर दाखल करण्यांत यावा.

(क) कंडिका 'म' नंतर पुढील कंडिका दाखल करावी :—

" (म१) कलम ५०-अ, पोट-कलम (१) अन्वयें अर्ज करण्याची रीत ; "

(ड) कंडिका (ओ) नंतर, पुढील नवीन कंडिका दाखल करावया :—

" (ओ१) ज्या शर्तींस व निर्बंधांस अधीन राहून समितीनें कलम ५६इ, पोट-कलम (२) अन्वयें मालमत्तेविषयीं व्यवहार केला पाहिजे त्या शर्ती व ते निर्बंध ;

(ओ२) कलम ५६-आय, पोट-कलम (२) अन्वयें समितीचे अध्यक्ष, खजीनदार आणि सदस्य यांस द्यावयाचें सन्मान्य वेतन, फी आणि भत्ते आणि ज्या निधींतून असें सन्मान्य वेतन, फी व भत्ते देण्यांत आले पाहिजेत तो निधि ;

(ओ३) ज्या मध्यंतरांत समितीची बैठक घेण्यांत आली पाहिजे तें मध्यंतर व कलम ५६-जे अन्वयें समितीनें अनुसरावयाची कार्यरीति ;

(ओ४) सेवेच्या ज्या अटींवर व शर्तींवर, कलम ५६-म अन्वयें समितीचे चिटणीस व अधिकारी यांच्या नेमणुका करण्यांत येतील त्या अटी व शर्ती आणि ज्या निधींतून त्यांचीं वेतनें व भत्ते देण्यांत येतील तो निधि. ".

४०. उक्त अधिनियमाचें कलम ८५ नंतर पुढील नवीन कलमें दाखल करावीं :— सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ यांत ८६, ८७ आणि ८८ हीं नवीन कलमें दाखल करणें.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, हा राज्याच्या इतर क्षेत्रांत अंमलांत आल्यानंतर इतर अधिनियम रद्द करणें व बचाव.

"८६. (१) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (एकत्रीकरण आणि सुधारणा) अधिनियम, १९५९ अन्वयें, हा अधिनियम राज्याच्या ज्या क्षेत्रांत लागू करण्यांत आला त्या क्षेत्रांत तो अंमलांत आल्यानंतर,—

(१) राज्याच्या सौराष्ट्र व कच्छ विभागांत अंमलांत असलेल्या धार्मिक देणग्यांबाबत अधिनियम, १८६३,

(२) राज्याच्या विदर्भ विभागांत अंमलांत असलेला मध्यप्रदेश धर्मादाय निधि अधिनियम, १९५१, आणि

(३) ज्यास विभाग ७-अ लागू असेल अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थे-संबंधींचा कोणताहि विधि हा ज्या मर्यादेपर्यंत या अधिनियमाच्या उपबंधांसारखा असेल त्या मर्यादेपर्यंत विश्वस्तव्यवस्थेसंबंधीं असलेला कोणताहि विधि ;

हे रद्द होतील.

(२) ज्या तारखेस (जिचा या कलमांत यापुढें उक्त तारीख म्हणून निर्देश केला आहे) या अधिनियमाचे उपबंध, कलम १, पोट-कलम (४) अन्वयें कोणत्याहि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या वर्गास लागू करण्यांत येतील त्या तारखेस, अशा विश्वस्तव्यवस्थेस किंवा विश्वस्तव्यवस्थांच्या वर्गास लागू असलेले अनुसूचि अअ मध्यें निर्दिष्ट केलेले या अधिनियमांचे उपबंध त्यांस लागू होण्याचें बंद होईल.

(३) या कलमांत अन्यथा जी कोणतीहि तरतूद केली असेल ती खेरीजकरून, अधिनियम अशा रीतीनें रद्द करण्यांत आल्यामुळें किंवा ते लागू होणें बंद झाल्यामुळें,—

(अ) उक्त तारखेपूर्वी रद्द करण्यांत आलेल्या किंवा लागू असण्याचें बंद झालेल्या विधीन्वयें योग्य रीत्या केलेली किंवा करू दिलेली कोणतीहि गोष्ट ;

(ब) अशा रीतीनें रद्द झालेल्या लागू असण्याचें बंद झालेल्या कोणत्याहि विधीन्वयें उक्त तारखेपूर्वी अगोदरच संपादन केलेला, पत्करलेला किंवा प्राप्त झालेला कोणताहि हक्क, स्वामित्वाचा हक्क, हितसंबंध, कोणतेंहि बंधन किंवा कोणतीहि जबाबदारी ;

(क) असा हक्क, स्वामित्वाचा हक्क, हितसंबंध, बंधन किंवा जबाबदारी यांच्या संबंधांतील कोणतेंहि वैध कामकाज किंवा कोणतीहि वैध उपाययोजना यांस कोणत्याहि रीतीनें बाध येणार नाहीं :

परंतु, अनुसूचि अअ मध्यें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि अधिनियमान्वयें कोणत्याहि न्यायालयापुढें, जींत राज्य सरकार, कमिशनर, रजिस्ट्रार किंवा कोणताहि अधिकारी पक्षकार आहे अशी कोणतीहि वैध कारवाई अनिर्णित असेल तर, अशा वैध कारवाईत चॅरिटी कमिशनर हा, राज्य सरकार, कमिशनर, रजिस्ट्रार किंवा यथास्थिति असा अधिकारी यांच्याऐवजींचा पक्षकार आहे असें समजण्यांत आलें पाहिजे आणि अशा न्यायालयानें असें कामकाज निकालांत काढलें पाहिजे :

तसेंच, मध्यप्रदेश धर्मादाय निधि अधिनियम, १९५१ अन्वयें फौजदारी न्यायालयांत अनिर्णित असलेलें प्रत्येक कामकाज पोट-कलम (१) अन्वयें तो अधिनियम रद्द झाल्यानंतर समाप्त करण्यांत आलें पाहिजे.

(४) पोट-कलम (३) मध्यें कांहींहि असलें तरी अनुसूचि अअ मध्यें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि अधिनियमान्वयें कोणत्याहि प्राधिकाऱ्यासमोर (न्यायालय वगळून) उक्त तारखेच्या निकटपूर्वी अनिर्णित असलेलें सर्व कामकाज

हें चालू ठेवण्यांत आलें पाहिजे आणि तें मुंबईच्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांबाबत (एकत्रीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९ हा संमत झाला नव्हता असें समजून त्या अधिनियमान्वयें निकालांत काढलें पाहिजे.

(५) अनुसूचि अअ मध्यें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि अधिनियमाचा अंमल बंद असला तरीहि, अशा कोणत्याहि अधिनियमान्वयें द्यावयाच्या अंशदानांची व रकमांची सर्व थकबाकी ही जणूं कांहीं ती या अधिनियमाच्या उपबंधान्वयेंची थकबाकी आहे असें समजून ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वयें वसूल करण्यांत आली पाहिजे.

(६) मध्यप्रदेश सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांबाबत अधिनियम, १९५१ अन्वयें रजिस्ट्रारनें ठेवलेले सर्व दप्तर; हें चॅरिटी कमिशनरकडे किंवा चॅरिटी कमिशनर निर्देश देईल त्याप्रमाणें प्रति चॅरिटी कमिशनर किंवा सहाय्यक चॅरिटी कमिशनरकडे हस्तांतरित करण्यांत आलें पाहिजे.

८७. या अधिनियमांतील कोणताहि मजकूर— ज्यांस सन १९५४ चा अधिनियम क्रमांक २९ लागू आहे अशा विवक्षित वकफांना (Wakfs) किंवा सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक ३७ लागू असलेल्या गुरुद्वारांस हा अधिनियम लागू नसणें.

(अ) ज्यांस सन १९५४ चा वकफांबाबत अधिनियमाचे उपबंध लागू असण्याचें चालू असेल अशा राज्यांच्या कांहीं क्षेत्रांतील वकफांस; किंवा

(ब) नांदेड शिख गुरुद्वार सचखंड श्री हुजूर अपचलनगरसाहेब अधिनियम, १९५६ अन्वयें ज्याचा कारभार चालविण्यांत येतो अशा नांदेड गुरुद्वारास;

लागू असणार नाहीं.

८८. या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणण्यास कोणतीहि अडचण उद्‌भवल्यास, राज्य सरकारला राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारें, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठीं आवश्यक व इष्ट वाटणारी या अधिनियमाच्या उपबंधांशीं विसंगत नसेल अशी कोणतीहि गोष्ट करण्याचा अधिकार आहे.". अडचणी दूर करण्याबाबत तरतूद.

४१. उक्त अधिनियमाच्या अनुसूचि 'अ' नंतर पुढील नवीन अनुसूचि दाखल करावी :— सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ यांत नवीन अनुसूचि अअ दाखल करणें.

"अनुसूचि अ-अ".

१. पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत समाविष्ट असलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त, राज्याच्या अितर क्षेत्रास लागू असलेला, धर्मार्थ व धार्मिक विश्वस्तव्यवस्थांबाबत अधिनियम, १९२०.

(२) सावंतवाडी देवस्थान अधिनियम, १९३२.

(३) (हैदराबाद) देणगी विनियम, १३४९ फसली.

(४) मध्यप्रदेश सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५१.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या अनुसुचि 'ब' ची सुधारणा.

४२-अ. उक्त अधिनियमांतील अनुसूचि 'ब' मध्यें—

कलम ४७(१) व ४७-अ शीं संबंधित असलेल्या नोंदींत "४७(१)" यानंतर "४७-अअ" हा मजकूर दाखल करावा;

(ब) कलम ४७(६) शीं संबंधित असलेल्या नोंदीनंतर पुढील नोंद दाखल करावी:—

"५०-अ. योजना तयार करणें किंवा तींत फेरफार करणें यांसाठीं चॅरिटी कमिशनरकडे करावयाचा अर्ज. १० रुपये."

(क) कलम ५१(१) शीं संबंधित असलेल्या नोंदीनंतर पुढील नोंद दाखल करावी:—

"५५. निदेशाकरिता न्यायालयाकडे करावयाचा अर्ज ... [illegible]"

"५६-अ. मतप्रदर्शन, सल्ला किंवा निदेश यांसाठींचा करावयाचा अर्ज. १२·५० रुपये."

सन १९०८चा भारताचा अधिनियम क्रमांक १६ याचीं कलमें १८ आणि २८ ची सुधारणा.

४३. मुंबई राज्यास लागू असलेला भारताचा नोंदणीबाबत अधिनियम, १९०८ यांतील —

(१) कलम १८ मध्यें—

(अ) कंडिका (इइ) च्या शेवटीं असलेला "आणि" हा शब्द गाळण्यांत यावा, आणि

(ब) कंडिका (इइ) नंतर पुढील नवीन कंडिका दाखल करावी:—

"(इइ-१) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० याचें कलम १८, पोट-कलम (७), कलम २२, कलम २२-क, आणि कलम २८-अ अन्वयें पाठविलेलें ज्ञापन; आणि".

(२) कलम २८ मध्यें "आणि (इइ)" याऐवजीं "(इइ) आणि (इइ-१)" हा मजकूर दाखल करावा.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.

## BOMBAY ACT No. VII OF 1960.

### THE BOMBAY LOCAL BOARDS (EXTENSION TO SAURASHTRA AND KUTCH AREAS AND AMENDMENT) ACT, 1959.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति दिनांक २२ जानेवारी १९६० रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे :—

एन. के. द्रविड,

मुंबई सरकारचे सचिव,
विधि विभाग.

## BOMBAY ACT No. VII OF 1960.

### AN ACT TO EXTEND THE BOMBAY LOCAL BOARDS ACT, 1923 TO THE SAURASHTRA AND KUTCH AREAS OF THE STATE OF BOMBAY, TO REPEAL THE CORRESPONDING LAWS IN FORCE IN THOSE AREAS AND FOR THOSE AND CERTAIN OTHER PURPOSES FURTHER TO AMEND THAT ACT.

## सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७.

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" दिनांक २९ जानेवारी १९६० रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]

**मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ हा मुंबई राज्याच्या सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांस लागू करणें, त्या प्रदेशांमध्यें अंमलांत असलेले तत्सम विधि रद्द करणें आणि त्या व इतर विवक्षित कारणांसाठीं त्या अधिनियमांत आणखी सुधारणा करणें यांबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ हा, मुंबई राज्याच्या सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांस लागू करणें, त्या प्रदेशांत अंमलांत असलेले तत्सम विधि रद्द करणें आणि त्या व इतर विवक्षित कारणांसाठीं त्या अधिनियमांत आणखी सुधारणा करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबई स्थानिक मंडळ (सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांस लागू करणें आणि सुधारणा) अधिनियम, १९५९ असें म्हणावें. संक्षिप्त संज्ञा व प्रारंभ

(२) तो राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

*सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ हा मुंबई राज्याच्या सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांस लागू करणें.*

२. दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश व बृहन्मुंबई खेरीजकरून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत अंमलांत असलेला मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ हा याद्वारें मुंबई राज्याच्या सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांस लागू करण्यांत येत आहे आणि तो अशा रीतीनें लागू केल्यामुळें त्या प्रदेशांत अंमलांत असेल.

*सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १ ची सुधारणा.*

३. मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ (ज्याचा यांत यापुढें "मुख्य अधिनियम" असा उल्लेख केला आहे), याचें कलम १ यांत, "दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश व बृहन्मुंबईखेरीज पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास लागू आहे." या मजकुराऐवजीं "दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश व बृहन्मुंबईखेरीज पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास लागू असेल; आणि मुंबई स्थानिक मंडळ (सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांस लागू करणें आणि सुधारणा) अधिनियम, १९५९ याच्या प्रारंभाच्या तारखेस आणि त्या तारखेपासून तो, मुंबई राज्याच्या सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांसहि लागू होईल." हा मजकूर दाखल करण्यांत यावा.

*सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ ची सुधारणा.*

४. मुख्य अधिनियमाचें कलम २ यास त्या कलमाचें पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यांत यावा, आणि अशा रीतीनें नवीन क्रमांक दिलेल्या त्या पोट-कलमानंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यांत यावें:—

"(२) मुंबई स्थानिक मंडळ (सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांस लागू करणें आणि सुधारणा) अधिनियम, १९५९ याच्या प्रारंभाच्या तारखेस,—

(एक) सौराष्ट्र जिल्हा पंचायत अधिनियम, १९५६,

(दोन) सौराष्ट्र स्थानिक विकास निधि अधिनियम, १९५६, आणि

(तीन) भाग 'क' राज्यें (विधि) अधिनियम, १९५० अन्वयें मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेला मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३,

हे, या अधिनियमाचा विभाग १३ यांतील उपबंधांस अधीन राहून, रद्द होतील.".

*सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४५-अ ची सुधारणा.*

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ४५-अ मधील, "व राज्य सरकारनें पसंत केलेल्या" हे शब्द गाळण्यांत यावेत.

*सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५० ची सुधारणा.*

६. मुख्य अधिनियमाचें कलम ५०, यांतील कंडिका (न) ऐवजीं, पुढील कंडिका दाखल करण्यांत यावी:—

"(न) लोकांचें शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, सुख, सोय किंवा त्यांची सामाजिक अथवा आर्थिक स्थिति यांची ज्यायोगें वाढ होऊं शकेल अशीं दुसरी कोणतीहि स्थानिक स्वरुपाचीं कामें किंवा योजना हातीं घेणें; आणि".

७. मुख्य अधिनियमाचें कलम ८९ यांत, पोट-कलम (१), कंडिका (ब) मधील "व राज्य सरकारनें पसंत केलेल्या" हे शब्द गाळण्यांत यावेत.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ८९ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाचें कलम १२३-अ यांत, पोट-कलम (१) मधील "दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश खेरीजकरून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांतील" या मजकुरा-ऐवजीं, "हा अधिनियम ज्या प्रदेशांस लागू असेल त्या प्रदेशांतील" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १२३-अ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाचें कलम १३१-ड यानंतर पुढील नवीन कलम जादा दाखल करण्यांत यावें :—

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ यांत १३१-ई हें नवीन कलम जादा दाखल करणें.

"१३१-ई. निर्दिष्ट करण्यांत येतील त्या अटींना (असतील तर) अधीन ठेवून, राज्य सरकारला आदेशाद्वारें, या अधिनियमाखालील आपले अधिकार, कामें किंवा कर्तव्यें यांपैकीं सर्व किंवा कोणतेहि अधिकार, कामें किंवा कर्तव्यें (कलम १३३ अन्वयें नियम करण्याचा अधिकार खेरीजकरून) आपल्या हाताखालीं असलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे सोंपविण्याचा अधिकार आहे.".

अधिकार सोंपविणें.

१०. मुख्य अधिनियमाचें कलम १३३ यास पुढील परंतुक आणखी जोडण्यांत यावें :—

"तसेंच, स्थानिक मंडळाच्या प्रदेशांत किंवा अशा प्रदेशाच्या संबंधांत अस्तित्वांत असलेली विशिष्ट स्थानिक परिस्थिति लक्षांत घेतां, किंवा निर्दिष्ट करण्यांत येतील त्या अन्य कारणांसाठीं, राज्य सरकारास या कलमान्वयें, सर्वसामान्यत: सर्व जिल्हा स्थानिक मंडळांकरितां किंवा विशेषत: एक किंवा अधिक मंडळांकरितां नियम करण्याचा किंवा आदेश देण्याचा अधिकार आहे ; तसेंच राज्य सरकारास त्या-सारख्याच कारणांसाठीं, कोणत्याहि स्थानिक मंडळास किंवा मंडळांना सर्वसामान्य नियमांपैकीं किंवा आदेशांपैकीं कोणत्याहि नियमाच्या किंवा आदेशाच्या कक्षेतून वगळण्याचासुद्धां अधिकार आहे.".

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १३३ ची सुधारणा.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ यांत नवीन विभाग १३, जादा दाखल करणें.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम १३७-ग नंतर, पुढील नवीन विभाग जादा दाखल करण्यांत यावा :—

"विभाग १३.

मुंबई राज्याच्या सौराष्ट्र आणि कच्छ प्रदेशांच्या संबंधांत खास व तात्पुरते उपबंध.

अर्थविवरण.

१३८. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणें आवश्यक नसेल तर, या विभागांत,—

(अ) 'नेमलेला दिवस' या संज्ञेचा अर्थ, मुंबई स्थानिक मंडळ (कच्छ व सौराष्ट्र प्रदेशांस लागू करणें आणि सुधारणा) अधिनियम, १९५९ हा ज्या तारखेस अंमलांत येईल ती तारीख, असा समजावा ;

(ब) कोणत्याहि स्थानिक क्षेत्राच्या संबंधांत, 'अस्तित्वांत असलेलें मंडळ' या संज्ञेचा अर्थ, सौराष्ट्र जिल्हा पंचायत अधिनियम, १९५६ अन्वयें स्थापन करण्यांत आलेली किंवा भाग 'क' राज्यें (विधि) अधिनियम, १९५० अन्वयें मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशांस लागू केलेला मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ अन्वयें स्थापन करण्यांत आलेलें आणि नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अशा क्षेत्रावर क्षेत्राधिकार असलेली किंवा असलेलें यथास्थिति, जिल्हा पंचायत किंवा जिल्हा स्थानिक मंडळ असा समजावा ;

(क) (१) सौराष्ट्र प्रदेशाच्या कोणत्याहि भागाच्या संबंधांत, 'रद्द करण्यांत आलेला विधि' या संज्ञेचा अर्थ, यथास्थिति, सौराष्ट्र जिल्हा पंचायत अधिनियम, १९५६ किंवा सौराष्ट्र स्थानिक विकास निधि अधिनियम, १९५६ असा समजावा ;

(२) कच्छ प्रदेशाच्या कोणत्याहि भागाच्या संबंधांत 'रद्द करण्यांत आलेला विधि' या संज्ञेचा अर्थ, भाग 'क' राज्यें (विधि) अधिनियम, १९५० अन्वयें उक्त प्रदेशास लागू केलेला मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ असा समजावा ;

(ड) कोणत्याहि स्थानिक क्षेत्राच्या संबंधांत 'उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळ' या संज्ञेचा अर्थ, नेमलेल्या दिवशीं व उक्त दिवसापासून अशा क्षेत्रांवर क्षेत्राधिकार असणारें जिल्हा स्थानिक मंडळ असा समजावा.

उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाची रचना.

१३९. (१) नेमलेल्या दिवशीं आणि उक्त दिवसापासून, अस्तित्वांत असलेलीं मंडळें हीं, त्यांच्या अधिकारक्षेत्रांतील संबंधित स्थानिक क्षेत्रासाठीं, ह्या अधिनियमान्वयें स्थापन केलेलीं उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळें आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे.

(२) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अस्तित्वांत असलेल्या मंडळांत पद धारण करणारे सर्व सदस्य हे, नेमलेल्या दिवशीं व उक्त दिवसापासून उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाचे सदस्य आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे ; आणि पोट-कलम (३) च्या उपबंधांस व सदस्यांच्या संबंधांतील या अधिनियमाच्या इतर उपबंधांस अधीन राहून, ते यथास्थिति सौराष्ट्र किंवा कच्छ प्रदेशांत हा अधिनियम अंमलांत आला नसता तर अस्तित्वांत असलेल्या मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनीं ज्या मुदतीपर्यंत पद धारण केलें असतें त्याच मुदतीपर्यंत पद धारण करतील :

परंतु कमिशनरनें, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारें त्यास योग्य वाटेल अशा एकूण एक वर्षापेक्षां अधिक नसेल अशा मुदतीपर्यंत, अशा सदस्यांच्या पदावधींत वाढ करणें हें विधि संमत असेल ; आणि त्यानें पदावधींत वाढ केल्याबाबतचीं कारणें आदेशांत निर्दिष्ट केली पाहिजेत.

(३) ह्या कलमान्वयें उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाचा जो सदस्य होईल परंतु जर हा अधिनियम त्यावेळीं अंमलांत असता तर जो नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या दिवशीं, कलम ९ मध्यें निर्दिष्ट केलेल्या अपात्रतांपैकीं कोणत्याहि अपात्रतेस अधीन झाला असता असा कोणताहि इसम, नेमलेल्या दिवसाच्या निकट-पूर्वीच्या दिवशीं जर असा इसम, रद्द करण्यांत आलेल्या संबंधित विधीन्वयें, अस्तित्वांत असलेल्या मंडळाचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरत नसेल तर, पोट-कलम (२) मध्यें निर्दिष्ट केलेल्या मुदतींत तो अशा अपात्रतेमुळें उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरणार नाही.

परंतु जर असा सदस्य, नेमलेल्या दिवसानंतर, कलम ९ मध्यें निर्दिष्ट केलेल्या अपात्रतेपैकीं कोणत्याहि अपात्रतेस अधीन होईल तर तो, कलम ३०, पोट-कलम (१), कंडिका (अ) अन्वयें उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.

(४) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या दिवशीं, कोणत्याहि अस्तित्वांत असलेल्या मंडळाचें अध्यक्षपद किंवा उपाध्यक्षपद धारण करणारा प्रत्येक इसम हा, नेमलेल्या दिवशीं व उक्त दिवसापासून अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या संबंधांतील ह्या अधिनियमाच्या इतर उपबंधांस अधीन राहून, उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाचा अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष आहे असें समजण्यांत आलें पाहिजे :

परंतु, उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाच्या सदस्यांच्या पदावधींत पोट-कलम (२) यांत दिलेल्या परंतुकान्वयें वाढ करण्यांत आली असेल त्याबाबतींत, अशा सदस्यांचा पदावधि संपण्याच्या निकटपूर्वी उक्त मंडळाचें अध्यक्षपद किंवा उपाध्यक्षपद धारण करणाऱ्या कोणत्याहि इसमाचा पदावधि हा, अशा सदस्यांचा वाढविलेला पदावधि संपेपर्यंत, वाढविण्यांत आला आहे असें समजलें पाहिजे.

१४०. नेमलेल्या दिवशीं व उक्त दिवसापासून पुढील परिणाम घडून येतील :— अस्तित्वांत असलेल्या मंडळाऐवजीं नवीन मंडळें स्थापन केल्याचा परिणाम.

(१) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अस्तित्वांत असलेल्या मंडळाकडे निहित असलेली स्थावर व जंगम अशी सर्व मालमत्ता व मालमत्तेंतील कोणत्याहि स्वरूपाचे व कोणत्याहि प्रकारचे हितसंबंध हे नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अंमलांत असलेले निर्बंध व अटी आणि कोणत्याहि इसमाचे, संस्थेचे किंवा प्राधिकाऱ्याचे हक्क किंवा हितसंबंध यांस अधीन राहून, उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाकडे हस्तांतरित झाले आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे आणि ते आणखी आश्वासना-शिवाय उक्त मंडळाकडे निहित झाले आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे ;

(२) अस्तित्वांत असलेल्या मंडळाचे सर्व हक्क, जबाबदाऱ्या व बोजे (कोण-त्याहि करारावरून उद्भवणारे हक्क, जबाबदाऱ्या व बोजे धरून) हे उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाचे हक्क, जबाबदाऱ्या व बोजे आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे ;

(३) अस्तित्वांत असलेल्या मंडळास येणें असलेल्या सर्व रकमा ह्या —मग त्या कोणताहि कर म्हणून किंवा अन्यरीतीनें येणें असोत —उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळास वसूल करतां येतील आणि अशा वसुलीच्या कारणासाठीं अस्तित्वांत

असलेल्या मंडळास किंवा त्याच्या कोणत्याहि प्राधिकाऱ्यास, नेमलेल्या दिवसापूर्वी, जी कोणतीहि उपाययोजना करण्याची किंवा कामकाज दाखल कराण्याची मुभा होती अशी कोणतीहि उपाययोजना करणें किंवा असें कोणतेंहि कामकाज दाखल करणें हें उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाच्या अधिकारांतील असेल ;

(४) सौराष्ट्र जिल्हा पंचायत अधिनियम, १९५६ अन्वयें स्थापन करण्यांत आलेल्या जिल्हा पंचायत निधींतील आणि भाग क राज्यें (विधि) अधिनियम, १९५० अन्वयें कच्छ प्रदेशास लागू करण्यांत आलेल्या, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ च्या कलम ७४ अन्वयें स्थापन करण्यांत आलेल्या स्थानिक निधीची शिल्लक रक्कम आणि अस्तित्वांत असलेल्या मंडळास येणें असलेल्या ज्या कोणत्याहि रकमा उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळानें वसूल केल्या असतील त्या सर्व रकमा ह्या, उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाच्या स्थानिक निधीचा [illegible]

(५) सौराष्ट्र स्थानिक विकास निधि अधिनियम, १९५६ अन्वयें स्थापना करण्यांत आलेल्या स्थानिक विकास निधींतील शिल्लक रक्कम ही (कोणतीहि असल्यास) राज्य सरकारनें, त्यास योग्य वाटेल अशा रीतीनें, सौराष्ट्र प्रदेशांतील उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळांमध्यें वाटून दिली पाहिजे ;

(६) अस्तित्वांत असलेल्या मंडळाशीं केलेले सर्व करार आणि त्या मंडळाच्या वतीनें करून दिलेले सर्व लेख हे उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाशीं केलेले करार किंवा त्याच्या वतीनें करून दिलेले लेख आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे व ते त्याप्रमाणें अंमलांत असतील ;

(७) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी, रद्द केलेल्या कोणत्याहि विधीअन्वयें कोणत्याहि प्राधिकाऱ्यापुढें अनिर्णित असलेलें सर्व कामकाज आणि बाबी, असें कामकाज किंवा अशा बाबी दाखल करून घेण्यास आणि त्या निकालांत काढण्यास सक्षम असेल अशा या अधिनियमाखालील तत्सम प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित केल्या आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे ;

(८) नेमलेल्या दिवशीं अनिर्णित असलेल्या ज्या दाव्यांत आणि वैध कामकाजांत अस्तित्वांत असलेलें मंडळ पक्षकार होतं त्या सर्व दाव्यांत व वैध कामकाजांत, अस्तित्वांत असलेल्या मंडळाबद्दल उत्तराधिकारी मंडळ दाखल केलें आहे असें समजण्यांत आलें पाहिजे ;

(९) रद्द केलेल्या कोणत्याहि विधीअन्वयें किंवा अशा अस्तित्वांत असलेल्या मंडळाच्या क्षेत्रांत अंमलांत असलेल्या कोणत्याहि इतर विधीअन्वयें अस्तित्वांत असलेल्या मंडळाकडून किंवा त्याच्या संबंधांत करण्यांत आलेली आणि नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अंमलांत असलेली कोणतीहि नेमणूक किंवा योजना, काढण्यांत आलेली अधिसूचना किंवा नोटीस, बसविण्यांत आलेला कर, दिलेला आदेश, लैसेन्स किंवा दिलेली परवानगी, करण्यांत आलेला नियम, उप-विधि किंवा विनियम किंवा केलेला नमुना या गोष्टी, या अधिनियमाच्या उपबंधांशीं विसंगत नसतील तेथवर, जणूं कांहीं त्या उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाच्या संबंधित क्षेत्राच्या संबंधांत करण्यांत, काढण्यांत, बसविण्यांत, किंवा करण्यांत आल्या असल्या-प्रमाणें, त्या रद्द करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्याकडून त्या रद्द करण्यांत येईपर्यंत, अंमलांत राहतील ;

(१०) रद्द केलेल्या कोणत्याहि विधीअन्वयें किंवा अशा अस्तित्वांत असलेल्या मंडळाच्या क्षेत्रांत अंमलांत असलेल्या कोणत्याहि इतर विधीअन्वयें अस्तित्वांत असलेल्या मंडळाकडून किंवा त्याच्या संबंधांत करण्यांत आलेली आणि नेमलेल्या

दिवसाच्या निकटपूर्वी अंमलांत असलेलीं सर्व अंदाजपत्रकें, आकारण्या, मूल्यमापनें, मोजमापें व विभागण्या या अधिनियमाच्या उपबंधांशीं विसंगत नसतील तेथवर, त्या क्षेत्राच्या उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाकडून किंवा त्याच्या संबंधांत करण्यांत आल्या आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे ;

(११) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी, अस्तित्वांत असलेल्या मंडळाच्या नोकरींत असणारे सर्व अधिकारी व नोकर यांची उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाच्या नोकरींत बदली करण्यांत आली आहे असें समजण्यांत आलें पाहिजे व सक्षम प्राधिकाऱ्याकडून इतर तरतूद करण्यांत येईपर्यंत, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी जें वेतन व भत्ते, निवृत्तिवेतनें, भविष्य निधि, उपदान, सेवानिवृत्तीचे आणि इतर फायदे मिळण्याचा त्यांस हक्क होता तें वेतन व भत्ते, निवृत्तिवेतनें, भविष्य निधि, उपदान, सेवानिवृत्तीचे व इतर फायदे मिळण्याचा त्यांस हक्क असेल आणि सेवेच्या ज्या इतर [illegible]

परंतु, या अधिनियमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, अशा कोणत्याहि अधिकाऱ्याची किंवा नोकराची नोकरी या अधिनियमाच्या उपबंधांस अनुसरून बंद करण्याच्या उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाच्या अधिकारास बाध येणार नाहीं.

अस्तित्वांत असलेल्या मंडळांची विवक्षित कर्तव्य व कामें करण्याचें बंधन.

१४१. कलम ५० मध्यें कांहींहि असलें तरी, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी जें कर्तव्य करण्यास, किंवा जिची व्यवस्था ठेवण्यास, ती चालू ठेवण्यासाठीं किंवा त्यावर देखरेख ठेवण्यास अस्तित्वांत असलेलें मंडळ जबाबदार होतें असें कोणतेंहि कर्तव्य करणें किंवा अशी कोणतीहि संस्था, उपक्रम, उपाययोजना, काम किंवा सेवा यांची व्यवस्था ठेवणें, ती चालू ठेवणें, किंवा त्यावर देखरेख ठेवणें हें, राज्य सरकार आदेशाद्वारें उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळास अशा कर्तव्यांतून किंवा कामांतून मुक्त करीपर्यंत, उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळाचें कर्तव्य असेल.

प्रतिनियुक्त केलेल्या (डेप्युटेशनवर असलेल्या) सरकारी नोकरांना ठेवण्यासाठीं तरतूद.

१४२. कलम ११९ यांत आणि कलम १४०, कंडिका (११) च्या परंतुकांत कांहींहि असलें तरी, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अस्तित्वांत असलेल्या मंडळाच्या सेवेंत असलेल्या राज्य सरकारच्या कोणत्याहि अधिकाऱ्यास किंवा नोकरास राज्य सरकारकडून निर्दिष्ट करण्यांत येतील अशा, सेवानिवृत्तीचे फायदे धरून, सेवेच्या अटींवर व शर्तींवर, उत्तराधिकारी जिल्हा स्थानिक मंडळानें त्याच्या सेवेंत तात्पुरतें किंवा कायम ठेवून घेण्यास त्यास भाग पाडण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे.

तत्सम विधींच्या उल्लेखांचा अर्थ लावणें.

१४३. (१) सौराष्ट्र किंवा कच्छ प्रदेशांत अंमलांत नसलेल्या कोणत्याहि विधीचा किंवा अशा प्रदेशांत काम करीत नसेल अशा कोणत्याहि अधिकाऱ्याचा, संस्थेचा किंवा प्राधिकाऱ्याचा या अधिनियमांत केलेला उल्लेख हा निराळा इरादा दिसून येत नसल्यास, यथास्थिति, सौराष्ट्र किंवा कच्छ प्रदेशांत अंमलांत असलेल्या तत्सम विधीचा किंवा त्या प्रदेशांत काम करणाऱ्या अधिकाऱ्याचा, संस्थेचा किंवा प्राधिकाऱ्याचा उल्लेख असल्याप्रमाणें त्याचा अर्थ लावला पाहिजे.

(२) कोणत्याहि विधींत किंवा कोणत्याहि लेखांत केलेला, रद्द केलेल्या कोणत्याहि विधीच्या उपबंधांचा उल्लेख हा, निराळा इरादा दिसून येत नसल्यास, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांचा उल्लेख असल्याप्रमाणें त्याचा अर्थ लावला पाहिजे.

सौराष्ट्र प्रदेशांत कलम ९३ अन्वयें जमीन महसुलावरील उपकराचें नियमन करण्याबाबत विशेष तरतुदी.

१४४. कलम ९३ अन्वयें उपकर बसविण्याच्या कारणासाठीं,—

(१) सौराष्ट्र प्रदेशांतील 'ब' आणि 'क' वर्गाच्या गिरासदाराच्या किंवा बारखालीदाराच्या बाबतींत उपकराच्या रकमेचा हिशोब सौराष्ट्र जमीन सुधारणा अधिनियम, १९५१ याच्या कलम ४४ अन्वयें किंवा यथास्थिति, सौराष्ट्र बारखाली रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५१ याच्या कलम १९ अन्वयें व्याख्या केल्याप्रमाणेंच्या आकारणीच्या प्रत्येक रुपयावर १९ नये पैसे या दरानें केला पाहिजे. तो सौराष्ट्र जमीन सुधारणा अधिनियम, १९५१ याच्या कलम ४० अन्वयें किंवा सौराष्ट्र बारखाली रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५१ याच्या कलम १७ अन्वयें गिरासदारानें किंवा बारखालीदारानें द्यावयाच्या आकारणीच्या रकमेवर करतां कामा नये;

(२) सौराष्ट्र स्थानिक विकास निधि अधिनियम. १९५६ [illegible] तर, जमीन महसुलावरील उपकराचा हिशोब, त्या अधिनियमान्वये केलेल्या आकारणीच्या रकमेची कोणतीहि वजावट विचारांत घेतल्यानंतर करण्यांत आला पाहिजे.

कच्छ प्रदेशांत कलम ९५ अन्वयें पाणीपट्टीवर उपकर बसविण्यासाठीं विशेष तरतूद.

१४५. कच्छ प्रदेशांत, पाणीपट्टी बसविण्याबाबत विधीद्वारें इतर तरतूद करण्यांत येईपर्यंत, कलम ९५ खालील उपकर, राज्य सरकारकडून वेळोवेळीं आकारण्यांत येईल अशा पाणीपट्टीवर बसविण्यांत आला पाहिजे.

अडचणी दूर करणें.

१४६. या अधिनियमाच्या कोणत्याहि उपबंधांची अंमलबजावणी करतांना कोणतीहि अडचण निर्माण झाल्यास, राज्य सरकारला, प्रसंगानुरूप आवश्यक असेल त्याप्रमाणें, आदेशाद्वारें, अशी अडचण दूर करण्याच्या कारणासाठीं त्याला जें कृत्य करणें आवश्यक असल्याचें दिसून येईल असें कोणतेंहि कृत्य करण्याचा अधिकार आहे.".

(True translation)

P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.